ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# ना. धो. महानोर यांच्या कवितेतील सौंदर्य

**प्रा .बाळासो आण्णा सुतार** आबासाहेबमराठे महाविद्यालय, राजापूर , जि. रत्नागिरी

१९६० हे मराठी साहित्याच्या अविष्कारामधील महत्वाचे दशक होय. नवकाव्यासमोर मराठी कवितेचा जोरकस आविष्कार विविध प्रवाहांच्या माध्यमातून अविष्कारीत झाला. शिकलेली नवपिढी तळागाळातील अनुभवाचा आविष्कार करू लागली. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवाशी, मुस्लिम महानगरी अश्या प्रवाहातून साहित्याचा आविष्कार होत होता. या काळाच्या उत्तरार्धातच पॉप्युलर प्रकाशनच्या 'नवे कवी, नवी कविता' या योजनेतून महानोरांच्या 'रानातल्या कविता'हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. प्रतींनिधिक कवितासंग्रह म्हणून ना. धो. महानोर यांच्या कविता प्रकाशित करण्यात आल्या होत्या. या सोबतच वही, पावसाळी कविता, अजिंठा, प्रार्थना दयाघना, पानझड गांधी, शिवरायांची कहाणी हे कवितासंग्रह त्यांचे प्रकाशित झाले.प्रा. उत्तम क्षीरसागर यांनी ना. धो. महानोर यांच्या शंभर नव्या जुन्या कविता एकत्र करून 'पक्ष्यांचे लक्ष थवे' हा कविता संग्रह संपादित केला आहे.

निसर्गाच्या माध्यामातून भावना आविष्कार होणाऱ्या कवितांचा हा संग्रह आहे. निसर्गाच्या छायेतच महानोरांची कविता अंगात भिनलेली प्रीतीची चाहूल व्यक्त करते.

'अंगात माझिया'
भिनलाय डोलिया'

महानोरांना निसर्गात फक्त कलात्मक निर्मितीच जाणवत नाही तर ती निर्मिती शारीरीकही आहे. या निर्मिती क्षणाची किंवा त्याला आदीच्या आणि नंतरच्या क्षणाची अनेक चित्रे महानोरांनी स्त्री व निसर्ग यांच्या करवी रेखाटली आहेत. विजया राजाध्यक्ष रानाच्या संदर्भात एक अस्सल अनादी श्रृंगार अनुभव देणारी ही कविता मुळ अर्थाने रानातली कविता आहे.

या कवीचा रानावर एवढा जीव आहे कि, रान आणि कवी वेगळे राहत नाहीत एकरूप होवून जातात. ते इतके कि 'गुंतलेले प्राण ह्या रानात माझ्या' रान कविसाठी जीव कि प्राण होते कवी आपल्या भावना अनुभव यांची प्रतिबिंबे निसर्ग रूपातच पाहतो. मानवी जीवनातील शृंगारभावना व निसर्गरूप यांचे चित्रण त्यांच्या कवितेत प्रामुख्याने त्यांनी केले आहे. रान, भुई ही धीट सृजनशील व नवनिर्माण करणारी आहे. विजया राजाध्यक्ष म्हणतात. "आपल्या विविध रूपातून विक्रमातून रंगातून व नादातून तेही कवीशी हितगुज करते. काविपुढे जणू ते अनावृत अवस्थेत उभे राहते , कवीने आपल्याला भोगावे असे आव्हान देते. महानोरांनी हे आव्हान स्वीकारले आहे ,रानाच्या संवेदना त्यांनी जाणल्या आहेत त्याचे रानाशी झालेले सायुज्य शारीरिक आणि भावनिक अशा दोन्ही स्वरूपाचे आहे. तोच महानोरांचा संपूर्ण अनुभव आहे. त्याना या अनुभवापुढे इतर सगळे दुय्यम वाटते. रान हे त्यांचे ध्यान त्यांचा साक्षात्कार एकदा हा साक्षत्कार झाला कि नभ आणि भुई यांच्यातील भावसंबंध जाणवू लागतो."

ह्या नभाने ह्या भुईला हात द्यावे
आणि या मातीतून चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्यालो चांदणे लगडून जावे.

'नभाने भुईला दान देणे' , 'जोंधल्याळा चांदणे लगडून जाणे', 'पाखरांशी खेळ मांडून जाणे', 'फाटकी झोपडी हेच काळीज असणे ', 'शब्दगंधे तू बाहुत घावे' या कल्पना कवीने मानवीय पातळीवरून चित्रित केले आहेत. ही निसर्गानुभूती टिपण्याचा मोह कवीला सुटत नाही. निसर्ग हा या कवीच्या जिव्हाळ्याचा विषय झाला आहे. आपल्या कवितेतून त्यांनी लोकजीवनाची नस पकडून लोकगीते व संतपरंपरेच्या काव्यरूपातून काव्याची लय कवितेत पकडली. महानोरांचा निसर्ग हा देहधारी आहे तो हा निसर्ग आपल्या भावना शारीरिक पातळ्यावरून प्रकट होतो.

'पाण्यात गोठल्या छाया, काठावर स्तब्ध  निवांत
गुडघाभर पाण्यावरती, घुटमळे शेन्दरी झाक
ती लगबग सावरताना मांड्यात घोळ कवळून
अन नितळ नितळ अंगाचे पाण्यात सांधले ऊन
झाडांना फुटले डोळे, मावेना रूप डोळ्यात
मांड्यात घोळ कवळून ती स्तब्ध  उभी ऐन्यात'

यासारख्या मानवी व्यक्तिरेखा कवीने निसर्गाच्या रंगभूमीवर सादर केली आहे. या व्यक्तिरेखेतून प्रतीकात्मक श्रुंगार कवी सादर करतो.

बघ ना काळोख कसा झिंगत येतोय,
तुला या काळोखात कवळून घ्यायला.

'झाडे तिचे डोळे चुकवतात त्याना ठाऊक असतात तिचे घारे डोळे ' या कवितेत निसर्ग माणसाशी गप्पा मारताना दिसतात. महानोरांच्या बऱ्याच कविता हा अनुभव देतात. त्यांच्या कविता वाचकाला निसर्ग आणि मानव या दोघांमध्ये  फिरवतात. आपल्या कवितेना त्यांनी निसर्गातून मानवी भावभावनांचे भान दिले. या कविता निसर्गाला कवेत घेवून मानवी प्रवृत्तीवर भाष्य करतात. त्यामुळे त्यांची कविता निसर्ग संस्कार घेवून येते. त्या निसर्गरुपी वास्तूशिल्प आहेत.

'हीर्व्या पानात पानात' ही महानोरांची कविता वयात आलेल्या आपल्याच धुंधित वावरणाऱ्या प्रेमियूगुलांच्या शृंगारभाव व्यक्त निसर्गसंवेदनाच्या रूपाने व्यक्त करतो. कवीने या कवितेत  वापरलेल्या प्रतिमा व निसर्ग साहचार्य भावना शृंगारास उठावदारपणा देतात. शालीचे अंग शहारने पोटऱ्यातील गव्हाचे हसू, ओंब्यात दाटणे, अंग मोडण्यातून चालव होणे गव्हाचे शेत नशेत  झुलणे ही सगळी निसर्गाची किमया व्हावी कवि शृंगार भावनेने पाहतो. लोकजीवनात 'पाऊस ' हा पूजेचा , प्रार्थना यांचा विषय पण महानोर या पावसाला 'निर्मिती क्षम दाता ' संबोधतात. नागीन

नागीण मैथुनात मग्न / नग्न नागाच्या विळख्यात / स्वस्थ / सळसळते / अंगांग सगळे / आसमंत विसरून/ सुस्त / जडावल्या डोळ्याच्या प्राणात. निसर्ग जीवनातील नाग नागिणीचे मैथून कवी या कवितेतून मानवी  भाव भावनांचे सूचन करतो. या

आडोश्याला बसून
साजन   छेलछबेला
घन होवून बिलगणे

या ओळीतून लोकसंकेत  वापरून कवी श्रुंगाराची   मांडणी करतो. निसर्गाचे भरलेपण  व तारुण्यातील    भरलेपण या मध्ये समत्व शोधून रतिभाव चित्रित केला आहे. पाऊस भरलेले

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आभाळ ही महानोरांच्या कवितेतील पुरुषत्वाची आवडती प्रतिमा आहे. 'भरलं आभाळ' या कवितेत महानोरांनी मीलनोत्सुक श्रुंगार जाणीव व्यक्त केली आहे. श्रावणातील पावसाच्या सरी कोसळण्या आधीचे आभाळ व त्याची मिलनासाठी झालेली उत्सुक अवस्था अत्यंत सुंदर पध्दतीने कवीने चित्रित केली आहे.

'घन ओथंबून येती' या कवितेतून कवि निसर्गप्रतीमांच्या वापरातून चेतनिकरनातून शृंगार भावनेचे चित्रण करतो. या कवितेत कवीने शृंगाराच्या भावना उत्कट होण्यासाठी बनात राघु घिरघिरने, सागरास भरती येणे. लाटांनी वेधून घेणे. पिकास ओले केसर असणे. या निसर्ग प्रतिमा शृंगारास आणखी उत्कटपणा भरून येतो. या कवितेतील मिलना उत्सुक भावस्थिसाठी आभाळ, राघू, सागर या प्रथम पुरुषी प्रतिमा या कवितेत आल्या आहेत. सुधीर रसाळ म्हणतात, "इथे कवी हा रानाचाच जणू एक भाग बनला आहे. या रानाने त्यांची संवेदनशिलता घडविली आहे व तिचा रानाला एक अर्थपूर्णता देत आहे. हे रान शेतकऱ्याचे आहे.हे रान शेतकरी व दोघेही बीजारोपण, अंकुरसंवर्धनव बिजारक्षण या निर्मिती चक्रात मग्न आहेत. या रानाची वेगवेगळी रूपे म्हणजे या निर्मितीच्या वेगवेगळ्या अवस्था आहेत. अ अखंडपणे चाललेले हे निर्मिती चक्र रानात राबणार्या माणसाच्या जीवनाचा एक भाग बनलेले आहे. आपल्या जीवनाची कुळे या रानात घट्ट रोवून उभ्या असलेल्या माणसातील निर्मिती प्रेरणेला या रानामुळे जाग आली आहे . रानाची व माणसाची निर्मितीशक्ती, सर्जनशक्ती, एकमेकींशी बांधलेली आहे या जाणीवेत महानोरांची कविता जन्म घेते." निसर्गाची निर्मिती प्रक्रिया हि मानवाच्या आकलनापलीकडील गोष्ट आहे नीती अनीतीची क्षेत्रे ती कधीच ओलांडताना दिसते या प्रमाणेच कवी माणसाची सुध्दा रितीप्रेरणा अशाच नितीनिर्पेक्ष पातळीवरून महानोर स्वीकारतात.

'देहावरती चळ भरलेले अवखळ हात,
भरदुपार,
उघड्या रानात' त्यांनी त्यांच्या काव्यात नभ ही प्रतिमा पुरुष या अर्थाने व रानभुई हि स्त्री या अर्थाने वापरली आहे. निसर्गाशी एकरूप होवून महानोर शृंगाराचा मनमोकळा अविष्कार करतो. पाउस हि मिलनाची प्रतिमा वापरून निसर्ग संवेदना प्रकट करतात.

परवा असे झाले
राजबन्शी पंखाचे एक पाखरू आले
आणि तिच्या अंगाशी लगट करून गेले.

महानोरांच्या या कवितेत राजबन्शी पाखरू ही पुरुष प्रतिमा ही तिच्या अंगाशी लगट करणाऱ्या प्रियकराची प्रतिमा वापरली आहे.

लख्ख लाखेरी देहाच्या निळ्या रेषा मानू नये
खुळ्या नुसतेच डोळ्यांनी रान झेलू , गाऊ नये.

अशा सुंदर पध्दतीने महानोर शारीरिक संवाद साधतात.

"तिला अगदी सहज सहज बोलत गेलो
नितळ भुऱ्या मांड्यावरचा जाळ झालो
किंवा किती झाकशिल तेव्हा पानानी तुझे गर्भारपण

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पाखरांनी कधीच बोभाय केलाय गावभर

मानवी जीवनातील अनुभव आणि भावना कवीने कवितेतून चैतन्याच्या बागा पाऊस आणि रान यांचे सनातन नाते मांडतो.

महानोरांच्या कवितेत 'नभभुई', ही प्रतिमा वेगळ्या जाणिवांचे लेणे घेवून कवितेत वावरते. राजवंशी पाखरू असो पाखरू ही आभाळाशी निगडीत प्रतिमा तर तळे , पिके, झाड या प्रतिमा भूईची जागा घेतात त्यामुळे महानोरांची नभभूमी ही प्रतिमा निर्मिती सूत्र प्रतिमा वाटते. या प्रतीमेसोबतच महानोरांच्या कवितेत निसर्गातील विवध प्रतिमा वावरतात. स्वताला उधळीत जाणे, धुळीच्या ल्क्तारीत लाज गुंडाळणे, दुख फुल होणे , उध्वस्थ झालेले घाट , वैराण माळरान, घाटात हरवून गेलेले कौलारू घरांचे गाव, तांबड्या मातीचा साक्षात्कार पाहणे, आंबलेली माणसे, एकटाच कुठे अचल निश्वास घेत चमकणारा काजवा, शब्दाविन कोणी नुरते कवळायास, हसताना कलुन गेलेले नभ, तिच्या काचोळीला चांदण्याचा जर, आकाशाला कालोकाचा गहिवर येणे, आकाशाने आवंढा गिळणे, चीटपाखराच्या नजरेत भरणे, पानात छंद धुमसणे, झाडे झिंगून जाणे,पिवळ्या बांबूंच्या गीत्गांगेत पक्षी बुडून जाणे, गर्द पोपटी रंग मे खशी, अस्मानाच्या कडा झुकणे, कलत्या सांजेचे सोनेरी ताटवे, मोहाच्याही झाडाला मोह होणे, झिंगत येणारा काळोख, वाऱ्यांची गंधगर्भ लय अशा कवी कल्पना कवी मानवीकरण करत एक एक शब्द जीवन करून अर्थ वाहताना दिसतो. या कवीच्या रंम्य कल्पना, रसिकांना खुणावतात.

महानोरांच्या कवितेतून निसर्गाचे सुंदर रूप कवीने मांडले आहे. नभ आणि भूई यांच्यातील सनातन नाते, सृजनचे , निर्मिती अन त्याची प्रक्रिया निसर्ग संवेदनाच्या रूपाने व्यक्त केली आहे. जोंधळ्याला चांदण्याने लगडून जाण्यासाठी मातीत चैतन्याचा वास नवनिर्मिती होण्यासाठी भुईला नभाने दान द्यावे असे कवि म्हणतो. कवीने स्वत:ला निसर्गाशी जोडून घेतले आहे. चैतन्य सोहळ्याने आनंदित होतो. माणसाच्या सृजनाचा सोहळा संयतपणे भाषेत व्यक्त केला आहे. महानोर हे आपली कविता निसर्गाचे लेणे पांघरून अखंड कवितेत वावरतात रानाच नात लेखक आपल्या कवितेत घट्ट करत जातो त्याबरोबर रानातील लक्षवेधी धून कवी सहज टिपतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१ पावसाळी कविता पृ. ५२
२. रानातल्या कविता ना.धो. महानोर पॉप्युलर प्रकाशन प्रथमावृत्ती १९६७/२००८ पृ. ६३
३. रानातल्या कविता पृ. ६९
४. रानातल्या कविता पृ. १६
५. रानातल्या कविता पृ. ३६
६. काही मराठी कवी, जाणीवा आणि शैली, प्रतिमा प्रकाशन आवृत्ती १९९० पृ. १७८
७. रानातल्या कविता उनि. पृ. ४४
८. रानातल्या कविता वही पृ . ४५